# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा व कलावंत मेळावा.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व कलावंत मेळावा १४ जून २०११ रोजी सायं. ६.३० वा. यशवंत नाट्यमंदिर, माटुंगा येथे साजरा करण्यात आला. नाट्यक्षेत्रातील विविध स्तरांवर उल्लेखनीय कार्य केलेल्या एकूण ६८ रंगकर्मींना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. यावर्षीचे जीवनगौरव पुरस्कार श्री. प्रसाद सावकार आणि श्रीमती जयमाळा शिळेदार यांना देण्यात आले. या सोहळ्याला मुंबई येथील नाट्यरसिकांनी उदंड प्रतिसाद दिला. त्यावेळी विविध मनोरंजनाचे कार्यक्रम सादर करण्यात आले.

## नाट्य लेखन स्पर्धा

९१ व्या नाट्य संमेलनाचा विशेष उपक्रम म्हणून नाट्यलेखन स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत ६८ स्पर्धक सहभागी झाले. स्पर्धेसाठी आलेल्या अडुसस्ट नाट्यसंहितातून परिक्षक मंडळाद्वारे निवडण्यात आलेल्या विजेत्यांना १४ जून रोजी झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात पारितोषिके देण्यात आली. पारितोषिक विजेत्यांची नावे खालील प्रमाणे

| पारितोषिक | रक्कम | नाटकाचे नांव | लेखकाचे नांव |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | रू. २१,०००/- | ‘सीडलेस’ | श्री. रविंद्र बाळकृष्ण भगवते. |
| द्वितीय क्रमांक | रू. ११,०००/- | ‘भावना गोजिरवाण्या’ | श्री. ल. मो. बांदेकर |
| तृतीय क्रमांक | रू. ७,०००/- | ‘भारतीय दंड विधान’ | श्री. जयप्रकाश कुलकर्णी |
| संगीत नाटकासाठी विशेष पुरस्कार | रू. ३,०००/- | ‘संगीत कात्यायनी’ | डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे |

**उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व रू. १,०००/- प्रत्येकी**

| | |
|---|---|
| ‘संगीत मेघदूत’ | श्रीमती मालती माधव हळवे |
| ‘संगीत नुपुरे नमिली स्वरां’ | श्री. मनोहर वैद्य |

## एकांकिका स्पर्धा

नाट्य परिषदेतर्फे शाखां-शाखांत व घटक संस्थांमध्ये ‘कै. प्रा. डॉ. लक्ष्मणराव देशपांडे एकांकिका स्पर्धा’ ही राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा सुरू करण्यात आली. यावर्षीच्या एकांकिका स्पर्धेत नाट्य परिषदेच्या ५० शाखांपैकी २० शाखांनी भाग घेतला होता. एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी नाट्य परिषदेच्या यशवंत नाट्य मंदिर, माटुंगा, मुंबई